# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## <u>परिपत्रक क्र.१८८ /२०२५</u>

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध रिक्त अध्यासनांची अध्यासन प्राध्यापक (Chair Professor) पदे नामनिर्देशनाने भरावयाची असल्याने या परिपत्रकासोबत जोडलेल्या अध्यासनाच्या यादी मधील अध्यासनाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदांची अधिकची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे :

१. वयोमर्यादा किमान ६० वर्षे ते कमाल ७० वर्षे.
२. नियुक्ती/नामनिर्देशनाचा कालावधी ३ वर्षे अथवा वयाची ७० वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर असेल तोपर्यंत (प्रथमतः २ वर्षे आणि सदर कालावधीतील कामकाजाचा आढावा घेऊन पुढील प्रत्येक १ वर्षासाठी मुदतवाढीबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.)
३. दरमहा एकत्रित मानधन रु.५०,०००/-
(निवृत्तीवेतनधारक व्यक्तींना हे मानधन त्यांच्या निवृत्ती वेतनाव्यतिरिक्त देण्यात येईल.)

सबब ज्या व्यक्तींना अध्यासन प्राध्यापक पदाच्या नामनिर्देशनासाठी अर्ज करावयाचा आहे त्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unipune.ac.in) जाऊन नामनिर्देशन अर्ज भरावा. सदर नामनिर्देशनाचा अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी स्वतःचा पासपोर्ट साइज फोटो = .jpg , स्वाक्षरी = .jpg आणि बायोडेटा = .pdf स्वरुपात असावा.(फाईलची साइज २ एमबी पेक्षा जास्त नसावी.)

**ऑनलाईन अर्ज भरण्याकरीताचा कालावधी : दि. १८ जुलै, २०२५ ते दि. २८ जुलै, २०२५**
**अर्जांची छापील प्रत (Printout) आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्याचा अंतिम दिनांक : दि. ३१ जुलै, २०२५**

**अर्ज भरण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाऊन पुढीलप्रमाणे माहिती भरण्यात यावी :**

विद्यापीठ संकेत स्थळ (www.unipune.ac.in) => Administration => Administration (Teaching) => Apply for Nomination System => मध्ये जाऊन प्रथम User Manual मधील सुचना अवश्य वाचाव्यात आणि त्यांचे पालन करावे. त्यानंतर Login => User Name => Password => तयार झाल्यावर प्रथम Profile तयार करुन घ्यावा, Educational Qualification, Teaching Experience आणि शेवटी फोटो, स्वाक्षरी आणि बायोडेटा उपरोक्त उल्लेख केलेल्या स्वरुपात अपलोड करावा. त्यानंतर आपण भरलेल्या नामनिर्देशनाच्या अर्जाची प्रिंटआऊट घेऊन तपासावी. नामनिर्देशनासाठी भरलेल्या माहितीमध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास दुरुस्ती करुन अर्ज अंतिम स्वरुपात Online Submit करावा. ऑनलाईन अर्ज Submit केल्यानंतर आपणांस भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

सदर नामनिर्देशन अर्जांची छापील प्रत (Printout), बायोडेटा आणि इतर आवश्यक कागदपत्रासह उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्याकडे हस्तपोहोच किंवा पोस्टाव्दारे उपरोक्त नमुद केलेल्या कालावधीमध्ये सादर करावेत. नामनिर्देशन अर्जांची छापील प्रत (Printout) विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच सदर अर्जाचा नामनिर्देशनासाठी विचार करण्यात येईल, याची कृपया नोद घ्यावी.

याखेरीज, सोबत जोडलेल्या अध्यासनाच्या यादी मधील अर्हता धारण करत असलेल्या व्यक्तींच्या नावाची शिफारस करावयाची असल्यास अशी शिफारस ही ऑफलाईन पध्दतीने संबधित व्यक्तीचा बायोडेटा आणि इतर आवश्यक कागदपत्रासह करता येईल. त्याकरिता नामनिर्देशित करावयाच्या व्यक्तीचा बायोडेटा आणि इतर आवश्यक कागदपत्रे ही उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे हस्तपोहोच किंवा पोस्टाव्दारे उपरोक्त नमुद केलेल्या कालावधीमध्ये सादर करावीत.

प्राप्त झालेल्या अर्जामधून/ नामनिर्देशनामधुन रिक्त असलेले अध्यासन प्राध्यापकाचे पद भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा. क्र. : एटी/अध्यासन/ ८४४
दिनांक : १७ जुलै, २०२५

प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे
प्रभारी कुलसचिव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## अध्यासन प्राध्यापक पदांची पात्रता

| Sr. No. | Name of the Chairs | No. of Positions | Criteria |
|---|---|---|---|
| 1 | **Shantanurao Kirloskar Chair** | 01 | M.Com.,/M.B.A. and Ph.D. in Management Studies.<br>An eminent scholar with published work of high quality, actively engaged in research with 20 years of experience in post-Graduate teaching and/or experience of guiding research of doctoral level in the field of Management Science.<br>**OR**<br>An outstanding scholar with established reputation who has made significant contribution to knowledge in the field of Management Science/ or Eminent industrialist who have contributed significantly in the industrial growth at the National or International level.<br>Age Between 60-70 years.<br>**Experience** - 20 Years. |
| 2 | **Bank of Maharashtra Energy Studies Chair** | 01 | M.Sc. and Ph.D. in non-conventional Energy Sources.<br>An eminent scholar with published work of high quality actively engaged in research with 20 years of experience in post-Graduate teaching and/or experience of guiding research of doctoral level in the field of non-conventional energy sources.<br>Age Between 60-70 years.<br>**OR**<br>An outstanding scholar/industrialist/researcher/scientist with established reputation who has made significant contribution to knowledge in the field of non-conventional Energy Sources.<br>**Experience** - 20 Years. |
| 3 | **Mahatma Phule Chair** | 01 | An eminent scholar/writer with published work of high quality and actively engaged in research for promotion of ideas and philosophy of Mahatma Phule with 20 years of experience in post-Graduate teaching and/or experience of guiding research of doctoral level.<br>Age Between 60-70 years.<br>**OR**<br>An outstanding scholar/writer with established reputation who has made significant contribution to knowledge.<br>A social reformer/scholar who have worked in the field of Mahatma Phule's Satyashodhan Movement and promotion of education among depressed classes of society.<br>महात्मा फुले यांच्या कार्यावर व साहित्यावर संशोधनात्मक/व ज्ञानविस्तारात्मक विशेष अभ्यास. तसेच समकालीन सामाजिक चळवळी व साहित्याचा विशेष अभ्यासक, मान्यवर लेखक.<br>अनुभव-२० वर्षे |
| 4 | **Swatantryaveer Sawarkar Chair** | 01 | Must have held a rank in the Defence Forces not below that of Brigadier or its equivalent and must have undergone a course of training at a Staff College or its equivalent or must be a scholar of eminence in Defence Studies as evidenced by scholarly attainments and/or research publications of high merit or must be a post-graduate degree-holder with merit and must have teaching and research experience for 20 years or more at a University or research organization in Defence/Strategic Studies.<br>Age Between 60-70 years. |